Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 35 – 45

DOI: 10.5281/zenodo.8330871

Original Research Article

# मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या इतिहासातील प्रमुख घटना

श्री निमिष संभुदेव जाधव

इतिहास संशोधक, मुंबई विद्यापीठ, महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: nimishjadhav45@gmail.com

Received: 09 September, 2023 | Accepted: 11 September, 2023 | Published: 13 September, 2023

**गोषवारा**

मराठवाडा मुक्तीसंग्राम हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा भाग आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता समाप्त होऊन भारताची फाळणी झाली व हिंदुस्थान (भारत) व पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र, सार्वभौमत्व संपन्न राज्ये उद्यास आली. १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्य कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले, पण त्यावेळी भारत देश विविध संस्थानांमध्ये विखुरलेला होता. संस्थानातील इंग्रजांची सत्ता नष्ट झाली, इंग्रजांनी संस्थानासमोरतीन पर्याय सुचवून भारताचे असंख्य तुकडे पडण्याचा डाव होता, जर संस्थाने स्वतंत्र राहिली तर भारताच्या अखंडतेवर मोठा प्रहार होईल. संस्थानाची संख्या ५६५. ५६५ पैकी ५६२ संस्थाने भारतात विलीन करण्यात आली. काही संस्थाने ही आकाराने मोठी किंवा लहान होती. संस्थानाकांनी जनकल्याणाकडे, राज्याच्या विकासाकडे फारसे लक्ष दिले नाही. हैदराबाद संस्थान, जम्मू आणि काश्मीर संस्थान आणि जुनागढ ही तीन संस्थाने स्वतंत्र होती म्हणजेच भारतात सामील नव्हती. त्यापैकी एक म्हणजे हैदराबाद संस्थान होय. या संस्थानांत महाराष्ट्रातील मराठवाडा, आंध्रप्रदेशाचा बराचसा भाग आणि कर्नाटकचा काही भाग यात सामील होता. हैदराबाद मुक्ती संग्रामात मराठवाड्याचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान होते म्हणून याला 'मराठवाडा मुक्ती संग्राम' असेही म्हणतात. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थानावर निजामची सत्ता संपुष्टात येऊन हे संस्थान भारतात यशस्वीरीत्या सामील झाले.

**महत्त्वाचे शब्द:** मराठवाडा, स्वातंत्र्यसेनानी, निजाम, संस्थाने, सैनिक कारवाई, विलीनीकरण, रझाकारांचे अत्याचार

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

ब्रिटिशांनी भारताची फाळणी करून भारताचे दोन तुकडे केले, हिंदुस्थान (भारत), पाकिस्तान (वायव्य सरहद्द प्रांत). भारतापुढे तीन पर्याय ठेवले. संस्थनांनी भारतात सामील व्हावे, संस्थनांनी पाकिस्तानाला सामील व्हावे किंवा संस्थनांनी आपले वेगळे स्वतंत्र, सार्वभौम राज्य निर्माण करावे.[१] जर संस्थाने खरोखरच स्वतंत्र राहिली भारताच्या अखंडतेवर मोठा प्रहार होईल. भौगोलिकदृष्ट्या विचार करता हे शक्य नव्हते. त्यामुळे सरकारकडून सातत्याने प्रयत्न करून संस्थानिकांची समजूत घालण्यात आली. त्यांच्याशी चर्चा वाटाघाटी करण्यात आल्या. त्याचेच फलित म्हणून १९४७ ते १९४९ या काळात काश्मीर, हैदराबाद, जुनागड, मणिपूर आणि त्रिपुरा ही संस्थाने भारतात सामील होण्यास तयार झाली.[२] लोकसंख्या आणि विस्तार या संदर्भात हैदराबाद हे भारतातील सर्वांत मोठ्या संस्थानापैकी एक होते. हैदराबाद संस्थानात महाराष्ट्रातील मराठवाडा, आंध्रप्रदेशाचा बराचसा भाग आणि कर्नाटकचा भाग मोडतो.[३] मोगल बादशहा औरंगजेब याचा मृत्यू इ. स. १७१३ झाला. त्यानंतर इ. स. १७१३ मध्ये दिल्लीचा बादशहा फरुखशियरने आपला सेनापती गझीउद्दीनला दख्खनचा सुभेदार बनवून हैदराबादला पाठवले. त्यास “निजाम- उल्- मुल्क” तसेच “असफजहा” अशा महत्त्वाच्या पदव्या बहाल केल्या. तेव्हापासून मीर कमरुद्दीन घराणे असफजाही म्हणून ओळखले गेले. निजाम- उल्- मुल्कने दिल्लीची दुर्बळ बादशाही झुगारून १७२४ मध्ये दक्षिणेत स्वतःचे राज्य स्थापन केले.[४]

असफजाही राजवट ही औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दख्खनेत निर्माण झालेल्या राजकीय पोकळीचा परिपाक होती. मराठवाडा, वऱ्हाडचा काही भाग, तेलंगणा उत्तर-पूर्व, कर्नाटक ही राज्ये येतात.[५] मीर उस्मान अली या सातव्या निजामाने ही निजामशाही (१७१९ ते १९४८) राजवट टिकली. निजाम दिल्लीच्या बादशाहीशी कधीही प्रामाणिक नव्हता. आपली सत्ता कायम टिकवून ठेवणे याच स्वार्थी हेतूने त्याने सर्व उत्तराधिकारी कधी फ्रेंचाबरोबर तर कधी इंग्रजांबरोबर मैत्री करीत राहिले. पेशवेकाळात मराठ्यांशी झालेल्या अनेक संघर्षात पराभूत होऊनही खोटे तह करून आपले राज्य सुरक्षित ठेवले. १८५७ च्या उठावात निजामाने भारतीयांना मदत केली नाही. त्यामुळे ब्रिटिशांनी निजामाला कायम संरक्षणाचे वचन दिले. इंग्रजांच्या संरक्षणामुळेच निजमाचे राज्य स्वतंत्र व सुरक्षित राहिले. भारताला स्वातंत्र्य मिळूनही निजामचे राज्य स्वतंत्र होते. चारही बाजूंनी भारताच्या क्षेत्राने घेरलेले हैदराबाद राज्याचे क्षेत्रफळ ८२ हजार वर्गमैल होते व त्याची लोकसंख्या एक करोड, साठलक्ष होती. त्यातील ८५ टक्के जनता हिंदू होती. तरीही बहुसंख्य जनतेची मागणी भारतात विलीन होण्याची असूनही निजमाने त्यास नकार दिला[६] आणि मराठवाडा मुक्ती संग्रामाची पार्श्वभूमी तयार होत गेली.

**निजामचे हिंदुस्तानाविरोधी धोरण**

निजमाने हिंदूंची सर्व बाजूंनी गळचेपी करणारी धोरणे होती. उर्दू ही सरकारी कामकाजाची अधिकृत भाषा होती आणि उर्दू भाषा हेच शिक्षणाचे माध्यम होते. इतर प्रादेशिक भाषांतून शिक्षण घेण्यावर (जसे मराठी, कन्नड, तेलगू इत्यादी) या वेळी अनेक बंधने होते. हिंदु- बहुसंख्य असतानाही सरकारी नोकऱ्यांतील त्यांचे प्रमाण २० टक्के होते.

सरकारी मुस्लिम मोठया संख्येने होते. राजकीय चळवळींवर अनेक बंधने होतीच परंतु सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळींवरसुद्धा अनेक निर्बंध होते. धार्मिक बाबतीत तर हिंदूंना अनेक जाचक, अन्यायी आणि पक्षपाती नियमांना तोंड द्यावे लागत होते. हिंदूंना धार्मिक बाबतीत मोकळेपणाने जगणे अशक्य झाले होते. वृत्तपत्रांवर बंधने होती. नागरी हक्कांपासून संस्थानातील नागरिक वंचित होते.[७] निजामने जनतेची शारीरिक आणि मानसिक छळ करीत होता.

**आर्य समाजाची महत्वपूर्ण भूमिका**

आर्य समाजाची शाखा इ.स. १८९१ मध्ये धारूर (बीड) येथे स्थापन करण्यात आली. या मुक्ती चळवळीत महत्वाची भूमिका बाजावली. केशवराव कोरटकर[८] हे इ.स. १९०४ ते १९२१ या काळात आर्य समाजाच्या हैदराबाद शाखेचे अध्यक्ष होते. वामनराव नाईक[९] यांच्यासमवेत केशवराव कोरटकर यांनी सामजिक परिषद (सोशल कॉन्फरन्स), हिंदू स्थायी समिती, जनता परिषद, जनसंमेलन, पुनर्नसंमलेन इत्यादी संस्थांची स्थापना केली. इ.स. १८९२ मध्ये या शाखेचे स्थलांतर हैदराबादमधील सुलतानबाजार येथे झाले. औरंगाबाद, लातूर, उस्मानाबाद, उदगीर, बीड, अहमदपूर, हिंगोली, परभणी, जालना, याठिकाणी आर्य समाजाच्या शाखा निर्माण झाल्या. हिंदू समाजात अस्मिता जागृत ठेवण्याचे कार्य आर्य समाजानेच केले. उदगीर चे भाई बन्सीलालजी यांनी उदगीरला मुख्य कार्यालय उघडले व "वेदिक संदेश"[१०] नावाचे वृत्तपत्र सोलापूरमधून प्रसिद्ध केले. येथूनच आर्य समाजाचे मुखपत्र "सुदर्शन" देखील प्रसिद्ध होई.[११] आर्य समाजाचे पाहिले गुरुकल इ.स. १९०७ मध्ये अजमेरचे पंडित भगवान स्वरुपजी यांच्या मार्गदर्शनाखाली धारूर येथे आर्य समाजाची स्थापना केली. हैदराबाद येथून "वेदिक आदर्श" हे साप्ताहिक पं. नरेंद्र चालवीत आर्य समाजाच्या या वृत्तपत्रांमुळे जनजागृती होऊन लोकांचे संघटन वाढले. आर्य समाजाने आपल्या समाजकार्यात अस्पृश्योध्दार, स्त्रियांचा विकास याकडेही लक्ष दिले, आपल्या संस्थेची द्वारे सर्व जातीजमातीसाठी खुली केली. उदगीर हे मराठवाड्यातील आर्य समाजाचे मुख्यलाय बनले. मराठवाड्यातील विविध भागात आर्य समाजाच्या शाखा स्थापन झाल्या. इ.स. १९३४ पासून निजाम सरकारने आर्य समाजाविरुद्ध दडपशाहीचे उपाय अवलंबिले. यज्ञवेदी नष्ट करण्यात आल्या, आर्य मंदिरे नष्ट करण्यात आली, त्यांचे साहित्य जप्त करण्यात आले, त्यांच्या सदस्यांवर हल्ले, छळ करण्यात आला आणि तुरुंगात टाकण्यात आले.[१२]

या समाजाने ठिकठिकाणी आर्य समाजमंदिरे, व्यायामशाळा, आखाडे व वाचनालये काढली. श्यामलाल, बन्सीलाल, शेषराव वाघमारे, दत्तात्रय प्रसाद, गोपाळराव शास्त्री हे कार्यकर्ते गावोगाव फिरून हिंदूंना वैदिक धर्माच्या ध्वजाखाली एकत्र आणत होते. निजामच्या राजवटीत हिंदूंना जबरदस्तीने बाटवून मुस्लिम बनविले जात होते त्यासाठी निजामने पगारी मौलवी नेमले जाते. आर्य समाजाने निजामाकडे केलेल्या १४ मागण्या केल्या होत्या.[१३] आर्य समाजाने याला विरोध करून धर्मांतरित हिंदूंना शुद्ध करून घेण्याची मोहीम सुरू केली. गेवराई, माजलगाव, उस्मानाबाद, लातूर, धारूर अशा अनेक गावात शुद्धीकरण मोहीम राबवून १० हजार धर्मांतरित हिंदूंना पुन्हा हिंदू धर्मात घेतले.[१४] सक्षम राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी तयार करण्यास प्रोत्साहन दिले. समाजाने आपल्या कार्याने आणि प्रचाराने संपूर्ण मराठवाडा

ढवळून काढला. मराठवाड्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी बलिदान दिले. सामजिक सुधारणा, शिक्षणाचा प्रसार आणि धार्मिक स्वातंत्र्य मिळवून आर्य समाजाने हळूहळू लोकांना मुक्तीच्या राजकीय चळवळीच्या मार्गावर नेले.[१५]

**महाराष्ट्रातील राष्ट्रीय चळवळीचा प्रभाव**

मराठवाड्यातील तरुणांवर बाळ गंगाधर टिळक, विनायक दामोदर सावरकर यांच्या विचारांच्या प्रचंड प्रभाव पडला. औरंगाबादमध्ये मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा करण्यास सुरुवात झाली. इ.स. १९०१ मध्ये ताई महाराज प्रकरणात टिळकांनी मराठवाड्याचा दौरा केला, तेव्हा औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये स्वदेशी चळवळ पसरू लागली. त्यामुळे निजाम अस्वस्थ झाला. हिंदूंमध्ये, विशेषतः ब्राम्हणांमध्ये राष्ट्रवादी भावना प्रबळ होती. निजामने राष्ट्रवादीच्या भावना रोखण्यासाठी अनेक दडपशाहीचे उपाय वापरले. अनंत कान्हेरे[१६] हा औरंगाबादचा तरुण नाशिकला गेला, तेथे त्याची भेट कृष्णाजी कर्वे आणि विनायकराव देशपांडे यांच्याशी झाली. या तिघांनी नाशिकच्या जिल्हा दंडाधिकारी जॅक्सनची हत्या करण्याचा निर्णय घेतला आणि त्यानुसार अनंत कान्हेरे यांना २१ डिसेंबर १९०९ रोजी जॅक्सनवर गोळया झाडल्या आणि त्याबद्दल त्यांना अटक करण्यात आली. इंग्रज सरकारने त्याच्यावर कटाचा खटला रचला. कान्हरे आणि त्यांच्या काही साथीदारांना १९ एप्रिल १९१० रोजी ठाणे कारागृहात फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या सर्व घटनांचा मराठवाड्यातील तरुणांच्या मनावर खोल परिणाम झाला.

**सामाजिक सुधारणा**

समाजसुधारणा आणि एकता लोकसंघटना याशिवाय राष्ट्रवादी संघर्ष यशस्वी होणार नाही हे लक्षात आले. रानडे, आगरकर, फुले, गोखले या समाजसुधारकांच्या कार्यचा प्रभाव मराठवाड्यातील विचारवंतांवर होता. टिळकांच्या नेतृत्वाखाली रानडे, गोखले यांच्या नेतृत्वाखालील दोन विचारधारा अस्तित्वात होत्या. मराठवाड्यातही याच धर्तीवर लोकांची विभागणी झाली. वीर वामनराव नाईक हे टिळकांचे तर विनायकराव कोरटकर हे रानडे व गोखले यांचे अनुयायी झाले. केशवराव कोरटकर यांनी १९१५ मध्ये हैदराबाद येथे “सोशल सर्व्हिस लीग” ची स्थापना केली. लोकांचे प्रबोधन आणि सामजिक सुधारणा घडवून आणणे हा तिचा उद्देश होता. इ.स. १९१८ पासून मराठवाड्यात विविध ठिकाणी सामजिक परिषदा झाल्या. या परिषदांमध्ये प्राथमिक शिक्षण, स्त्री प्रशिक्षण, अस्पृश्यता निर्मूलन, विधवांचे पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह, ग्रंथालयाची स्थापना या विषयांवर सविस्तर चर्चा होऊन ठराव पारित करण्यात आले. त्यामुळे राज्यात काही ग्रंथालये, शाळा आणि वसतिगृहे निर्माण झाली. सामजिक मुक्ती हा राजकीय स्वातंत्र्यांचा पाया आहे;[१७] असे मानले जात आहे.

**सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळीचा उदय**

संपूर्ण महाराष्ट्रात ब्रिटीश अंमल होता. मात्र महाराष्ट्रात निजमाची राजवट होती. काही शाळा होत्या पण त्या उर्दु माध्यमच्या होत्या. निजाम सरकाराचे शिक्षणाबद्दलचे धोरण ब्रिटिश हद्दीपेक्षा वाईट होते. एका नोंदीनुसार १९२० च्या दशकात निजाम सरकाराच्या हद्दीत शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे २.४ लाख इतकी कमी होती. लोकसंख्या

मानाने हे प्रमाण शेकडा दोन इतके होते. सरकारी शाळा सुमारे ४००० होत्या. जेव्हा भारतात ब्रिटिश शासन सत्तीचे करू बघत होते तेव्हा मराठवाड्यात ही परिस्थिती होती. संस्थानांत मेडिकल स्कूल (१८४४), इंजिनिअर स्कूल (१८७०), निजाम कॉलेज (१८८७), आणि उस्मानिया विद्यापीठ (१९१८) स्थापन झाले. पण मराठवाड्यात उच्च शिक्षणाची सोय नव्हती. औरंगाबादेत एक इंटर कॉलेज व एक तंत्रशिक्षण कॉलेज होते.

पुढे १९२१ साली हैदराबाद मुक्तीसंग्रामाची पायाभरणी करणारी राष्ट्रीय शाळा व्यंकटराव देशमुख, अनंतराव कुलकर्णी यांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा येथे स्थापना झाली. स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे, राघवेंद्र दिवाण, देवीसिंह चौहान यांसारखे शिक्षक या शाळेत होते. आधुनिक शिक्षण व स्वातंत्र्याची प्रेरणा देणारी ही शाळा राष्ट्रीय प्रेरणेतून अंबेजोगाई, नांदेड, औरंगाबाद, येथेही खाजगी शिक्षणसंस्था सुरू केल्या. स्वातंत्र्याच्या चळवळी इतर भागात आकार घेत होत्या. त्यामुळे मराठवाड्यातही सामजिक आणि सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातून लोकं जागृती धरत होती. लातूर मध्ये पुण्यावरून येऊन लोकमान्य टिळकांनी इ.स. १८९१ पहिली जिनिंग प्रेस काढली. या संस्थानात मुद्रणस्वातंत्र्य नव्हते. ब्रिटीश सरकारने मान्यता दिलेल्या वर्तमानपत्रांनाही बंदी घालण्यात आली होती. या धोरणामुळे संस्थांनात वर्तमानपत्र फारशी निघू शकली नाहीत. नवीन वर्तमानपत्र अथवा छापखाना काढवायचा असल्यास सरकराची परवानगी देण्यात येत नसे. लक्ष्मणराव फाटक यांनी इ.स. १९२० मध्ये 'निजाम विजय' हैदराबादहून सुरू केले. आ. कृ. वाघमारे यांनी १० फेब्रुवारी १९३७ 'मराठवाडा' साप्ताहिकाची स्थापना केली. 'मुशीर' व 'सहिफा' या दोन उर्दू पत्रांना महिना ३०० रु. सरकारी मदत मिळत असे.[१८] मराठवाड्यात सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळीमुळे जोर धरू लागला त्यातून अप्रत्यक्ष स्वातंत्र्य चळवळीचे बीज पेरले गेले.

**महाराष्ट्र परिषदेची स्थापना**

शैक्षणिक व सामाजिक परिषदांमुळेही समाजात जागृती होण्यास मदत झाली. अनंतराव कुलकर्णी व अनंतराव वाघमारे यांनी मराठवाड्यात "महराष्ट्र संघ" स्थापन केला होता. पुढे मराठवाड्याचे राजकीय नेतृत्व करण्यासाठी कायमस्वरूपी राजकीय संघटनेची गरज निर्माण झाली. त्यातून इ.स. १९३७ मध्ये 'महाराष्ट्र परिषद' ही रा. गो परांजपे, केशवराव कोरटकर, काशिनाथ वैद्य, एकनाथ कुलकर्णी, अनंत भालेराव, गोविंदभाई श्रॉफ, वामन नाईक अशा विविध व्यक्तींच्या प्रयत्नांतून स्थापन झाली. सुरुवातीला मवाळ असलेली परिषद १९४१ नंतर जहलांच्या ताब्यात गेली. स्वामी रामानंद तीर्थ जहालवादी नेते होते. या परिषदेने इ.स. १९३७ ते १९४६ या काळात एकूण सहा अधिवेशने घेतली व जनतेला संघटित करण्याचे काम केले.[१९] असे असले तरी निजाम सरकाराने या परिषदेवर अनेक निर्बंध होते.

**हैदराबाद स्टेट काँग्रेस (२१ जून १९३८)**

अनेक संघटना वेगवेगळया स्तरावर कार्यरत होत्या. जानेवारी १९३८ मध्ये हैदराबाद येथील पीपल्स कन्व्हेन्शची स्थापना झाली. प्रजा शिक्षण परिषदही होती. आपले हक्क मिळविण्यासाठी संस्थानातील जनतेने तेलंगणा भागात आंध्र (तेलुगू) परिषद, मराठवाडा भागात महाराष्ट्र परिषद, कर्नाटक भागात कर्नाटक परिषद या संस्था स्थापन केल्या.

संस्थानाच्या मुक्ती लढयाचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ यांनी समर्थपणे केले.[२०] स्वातंत्र्यपणे काम केल्यास कोणतीही हेतू साध्य होणार नाही असे वाटले. या तीन संस्थांचे एकत्रीकरण करण्याची गरज होती. निजामाच्या दडपशाही कारवाया वाढत होत्या. त्यामुळे गोविंदभाई श्रॉफ, स्वामी रामानंद तीर्थ, ए. के. वाघमारे, काशीनाथराव वैद्य आणि दिगंबरराव बिंदू यांना अश्या सर्व संघटनांना एकत्र आणण्याची गरज वाटली. जोपर्यंत सर्व लोक एकत्र येत नाहीत तोपर्यंत निजामविरुद्ध ठोस कारवाई शक्य होणार नाही हे त्यांच्या लक्षात आले. राज्य संघटनेची जागा स्थानिक संघटना घेऊ शकल्या नाहीत. शिवाय, गांधीजींनी राज्याच्या राजकारणात सक्रिय रस घेण्यात सुरुवात केली होती, स्वामी रामानंद तीर्थ यांनी घरोघरी जाऊन लोकांना राज्यव्यापी संघटनेच्या छत्राखाली एकत्र येण्याची गरज पटवून दिली. शेवटी, हैदराबाद स्टेट काँग्रेसची स्थापना झाली. २१ जून १९३८ रोजी झाली. ती पूर्णपणे राजकीय संघटना होती.[२१] निजाम सरकारने मात्र ८ सप्टेंबर १९३८ कॉग्रेसच्या स्थापणेवर बंदी घातली. या पार्श्वभूमीवर स्टेट काँग्रेसच्या लोकांना कायदेभंगाच्या चळवळीशिवाय अन्य मार्ग उरला नाही. हैदराबाद स्टेट काँग्रेस आपला लढा नागरी हक्कासाठी आहे, असे स्पष्टपणे सांगितले. संपूर्ण संस्थानातून तरुण कार्यकर्ते सत्याग्रह करण्यासाठी तयार झाले. स्टेट काँग्रेसने शांततामय व सनदशीर मार्गाने लढा चालविला. या सत्याग्रहात एकूण १८ तुकड्या तुरुंगात गेल्या. स्टेट काँग्रेसने या संघटनेने १ हजार २०० सभासद नोंदविले. इ.स. १९३८ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी सत्याग्रह केला. त्यामुळे त्याच्यांवर खटला भरण्यात आला. स्वामीजींना दीड वर्षांनी सक्त मजुरीची शिक्षा ठोठाविण्यात आली.

स्टेट काँग्रेसने स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संघर्ष तीव्र झाला, जुलूम व अन्याय यांचा प्रतिकार करणे हीच खरी ईश्वरशक्ती आहे असे स्वामींजींचे सूत्र होते. सत्याग्रहीच्या सर्व तुकड्यांमध्ये मराठवाड्यातील तरुण आघाडीवर होते. गोविंदभाई श्रॉफ, माणिकचंद पहाडे यांनी कुशलपणे सत्याग्रहीचे संघटन केले. मराठवाड्यातील ३५० स्त्याग्रहींनी भाग घेतला. सत्याग्रहासाठी तरुणांची मने प्रज्वलित करण्यासाठी गोविंदभाई श्रॉफ, माणिकचंद पहाडे, बाबासाहेब परांजपे, पुरुषोत्तमराव चपळगावकर, कर्वे गुरुजी यांनी मोलाचे योगदान दिले. स्टेट काँग्रेस व जातीयवादी संघटना यांच्या सत्याग्रह्यामध्ये गल्लत होऊन स्टेट काँग्रेसबद्दल गैरसमज वाढू लागले. म्हणून महात्मा गांधीजींच्या आदेशावरून स्टेट कॉग्रेसचा सत्याग्रह स्थगित करण्यात आला.[२२]

**वंदे मातरम चळवळ (डिसेंबर १८३८)**

वंदे मातरम चळवळ ही मराठवाडा मुक्ती संग्रामातील महत्वपूर्ण मानली जाते. या चळवळीला विद्यार्थ्यांकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. हैदराबाद संस्थानात शिक्षण संस्थांमध्ये म्हणजे शाळा – महाविद्यालयात वंदे मातरम् हे गीत म्हणण्यास सक्त बंदी होती. मराठवाडा मुक्ती लढ्याचे पडसाद विद्यार्थ्यांच्या मनावर उमटू नयेत, म्हणून निजाम सरकार या अशा गोष्टी करत होते. विद्यार्थी वर्गात मनात निजामशाहीचे असंतोष हा खदखदत होता. त्या काळात उस्मानिया विद्यापीठात वारंगल, गुलबर्गा व औरंगाबाद येथे इंटरमिजिट कॉलेजस् होती. औरंगाबाद कॉलेजमध्ये विद्यार्थी हे निजामशाहीच्या अत्याचारामुळे बैचैन होते. गोविंदभाई श्रॉफ, विद्यार्थ्यांना चिथावणी देतात म्हणून त्यांना नोकरीतून काढण्यात आले होते. पुढे अचानक विद्यार्थ्यांनी १४ नोव्हेंबर रोजी, वसतिगृहामध्ये 'वंदे मातरम' म्हणण्यास प्रारंभ केला

आणि लगेच सरकारने त्यावर बंदी आणली. ही बंदी स्वीकारला विद्यार्थीतयार नव्हते. १६ नोव्हेंबर १९३८ रोजी विद्यार्थ्यांनी अन्नत्याग सत्याग्रह केला. १८ नोव्हेंबर १९३८ रोजी विद्यार्थ्यांची या प्रश्नावर रितसर बैठक झाली आणि ३० सप्टेंबर १९३८ रोजी, विद्यार्थ्यांनी संप पुकारला. या घटनेचे पडसाद हैदराबादमध्ये उमटले. विद्यार्थ्यांना गणवेशाची सक्ती करण्यात आली, पण त्यांनी प्रखर विरोध केला. शेवटी वंदेमातरम प्रश्नावर बेमुदत संप पुकारला. यात एकूण १ हजार २०० विद्यार्थी संपावर गेले. केवळ औरंगाबाद शहरात ३०० विद्यार्थी वंदेमातरम चळवळीत उतरले होते. वंदेमातरम् आंदोलनात सहभागी झालेल्या अनेक विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये काढून टाकण्यात आले. विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित झाले. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू टी. जे. केदार यांनी उदार अंत:करणाने उस्मानिया विद्यापीठातील काढून टाकलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला.

मराठवाड्यातील शालेय विद्यार्थ्यांची येवला, खामगाव व अहमदनगर येथे सोय करण्यात आली. त्रिपुरा काँग्रेस अधिवेशनात वंदेमातरम चळवळीस पाठिंबा देण्यात आला. नेताजी सुभाषचंद्र बोस, गांधीजी व पंडीत जवाहरलाल नेहरू, यांनी तरुणांच्या या उठावाला पाठिंबा दिला होता. विद्यार्थ्यांनी दिलेल्या या अभूतपूर्व लढ्यामुळे हैदराबाद संस्थानांत पुढे जी आंदोलने झाली, त्यासाठी राजकीय कार्यकर्ते व नेते वंदेमातरम् चळवळीने विद्यार्थी विश्वात फार मोठी जागृती घडवून आणली. इ.स. १९३८ ते १९४८ पर्यंतचा काळ हा मुक्ती संग्रामाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या काळात सर्व आघाड्यांवर बहुतेक वंदे मातरम् चळवळीच्या माध्यमातून जे अभूतपूर्व चैतन्य दाखवले, ते प्रशसनीयच मानले पाहिजे.[२३]

### १९४२ ची चळवळ

स्वातंत्र्याचा लढा ऐन बहरात आला होता. याचे महात्मा गांधी हे निर्विवाद सेनापती होते आणि त्यांची सेना होती 'काँग्रेस.' भारतीय नागरिकांच्या स्वातंत्र्य मिळवण्याच्या आकांक्षेला महात्मा गांधी यांनी निःसंशयपणे बळ दिले होते. महात्मा गांधी यांनी ते चैतन्यमय शब्द उच्चारले 'चले जाव'! समुद्रात लाटा उसळव्यात तशी समोरची गर्दी त्या दोन शब्दांमुळे उसळली. पुढे त्या शब्दांचे इंग्रजीसह अनेक भाषांमध्ये भाषांतर झाले. क्विट इंडिया, चालते व्हा असे.त्या दोन शब्दांच्या समूहात चैतन्य भरलेले होते. त्यावेळी संपर्कासाठी फोन होते, अत्यंत कमी रेडिओही कमी लोकांकडे असत.मात्र तरीही क्षणार्धात ते दोन शब्द देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले. "चले जाव" या दोन शब्दांनी केलेली ही क्रांती होती.[२४]

हैदराबादमध्येही चळवळ सुरू होताच निजामने या चळवळीला विरोध केला. महात्मा गांधीच्या आदेशानुसार स्वामीजींनी हैदराबाद संस्थानांत निजाम सरकारच्या विरोधात चळवळ सुरू केली. पोलिसांनी १६ ऑगस्ट १९४२ रोजी स्वामींना अटक केली. मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात सत्याग्रहाची केंद्रे उभारली गेली. मराठवाड्यात जवळपास ५३० लोकांनी सत्याग्रह केला व तुरंगवास पत्करला. स्वामीजीं, बाबासाहेब परांजपे व नारायण जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली अंबेजोगाई येथे सत्याग्रह करण्यासाठी ४३ तरुणांचा संघ तयार केला तेव्हा लष्कराने या तरुणांना त्याब्यात घेण्यासाठी

दडपशाही सुरु केला. बाबासाहेब परांजपेंनी दुसरे बनावट लोकं त्याच्या त्याब्यात दिले व मूळ ४२ तरुणांनी परभणीला जाऊन सत्याग्रह केला.[२५]

**इतेहाद् – उल् – मुस्लिमीनया**

संस्थानांत जनतेच्या मुक्तीसाठी लढा चालू असताना निजाम त्याचे पाठीराखे आपले प्राबल्य राखण्यासाठी निकारचे प्रयत्न करत होते. १९३६ च्या सुमारालाच संस्थांनाच्या लोकसंख्येतील मुस्लिमांचे प्रमाण वाढविण्यासाठी, विशेषतः दलित समाजातील गरीब माणसांचे सक्तीने धर्मांतर करण्याचा प्रयत्न काही ठिकाणी झाला. या प्रयत्नांना आर्य समाजाच्या आणि काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी हिंमतीने विरोध केला. दुसरा मोठा प्रयत्न मजलिसे इतेहाद् – उल् – मुस्लिमीनया संघटनेने प्रचाराच्या माध्यमातून केला. तिची स्थापना निजामाच्या प्रोत्साहनाने १९२७ मध्ये झाली होती. तिने अल्पकाळात रौद्र व विद्वेषी रूप धारण केले. निजामाने आपल्या राजकिय महत्वाकांक्षेसाठी अखेरपर्यंत तिचा वापर केला. केवळ मुस्लिमनांच राज्य करण्याचा अधिकार आहे व संघटित न झाल्यास त्यांचे अधिकार संपतील असा तिचा प्रचार होता. नंतरच्या काळात या संघटनेने मिळेल ते शस्त्रे घेऊन दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न चालवला. अनेक खेडेगावात अनन्वित अत्याचार केले. काही ठिकाणी जाळपोळ करण्यात आली. मुधोळ तालुक्याचे संघटक गोविंदराव विनायकराव पानसरे यांच्यासारख्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या खूनही झाले. १९४० साली बीदर येथील बाजरपेठ जाळून टाकण्यात आली. १९४७ मध्ये लोहा गावाच्या गढीवर हल्ला करून निरपराध्यांचे बळी घेण्यात आले. रझाकारांच्या गुंडगिरीविरुद्ध पोलीस कोणतीही कारवाई करत नसत.[२६]

**महिलांचा सहभाग**

स्त्रियांच्या राजकीय जागृतीचा अविष्कार या मुक्तीसंग्रामात दिसून आला. यावेळी स्त्रियांनीही मोर्चे, तुरुंगवास, भूमिगत चळवळी सत्याग्रह यात मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. सुशीलाबाई दिवाण यांनी “महिला विद्या मंदिर” स्थापन करून सामजिक कार्य केले. दगडाबाई शेळके यांनी सशस्त्र उठावाच्या दिशेने प्रयत्न केले. जंगल सत्याग्रहात मराठवाड्यातील १५०० महिलांनी भाग घेतला. ऑगस्ट १९४७ मध्ये निजाम कॉलेजपासून निघालेल्या महिलांच्या मोर्चावर रझाकारांनी लाठीहल्ला केला. त्यात कालिंदी देशपांडे जखमी झाल्या. आशाताई वाघमारे यांनी स्वतः गुलमुंडीवर तिरंगा फडकवला. तसेच त्यांनी तुरंगातील कैद्यांच्या कुटूंबाची काळजी घेणे, शस्त्रास्त्रांची ने-आण करणे, कैद्यांसाठी साक्षरता वर्ग चालवणे इत्यादी. कामे केली. ईट येथे काकीसाहेब देशमुख यांनी झेंडा फडकवला. महिलांच्या सहभागामुळे मराठवाडा मुक्तीसंग्रामास धार प्राप्त झाली.

**शेवटचे युद्ध**

स्टेट काँग्रेसच्या नेतृत्वाखाली होणारे सर्व सत्याग्रह शांततावादी असूनही निजामचे पोलीस, लष्कर, रझाकार हे मात्र स्त्याग्रहींवर सशस्त्र हल्ले करीत होते. त्यामुळे त्यांना प्रतिकार करण्यासाठी काँग्रेसने लष्करी कॅम्प उभारले. ४७ पोलिसांनी सशस्त्रप्रतिकार केला. स्वातंत्र्यसैनिकांच्या हल्ल्यात अनेक रझाकार, पोलीस, रोहिले व अरब ठार झाले.

नारायण पवार[२७] नावाच्या स्वातंत्र्यवीराने ४ डिसेंबर १९४७ रोज खुद्द निजामाच्या गाडीवर हातबॉम्ब टाकला पण निजाम बचावला व नारायणला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. सरकारला वठणीवर आणण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी सरकारी गोदाम, बँका लुटल्या, वाहतूक व दळवळणाचे नुकसान, टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वेचे रूळ उध्वस्त करणे, सरकारी कार्यालये जाळणे या मार्गाने जनता सरकारला त्रस्त करीत होती.[२८]

**पोलीस कारवाई (ऑपरेशन पोलो)**

स्वामी रामानंद तीर्थ[२९] दिल्लीला जाऊन काँग्रेसच्या मंत्र्यांना हैदराबादला लष्करी दल पाठवण्याची निकड पटवून देण्याचा प्रयत्न केला. सरदार बलदेव सिंग आणि सरदार पटेल यांसारख्या काँग्रेस नेत्यांना हे कळून चुकले होते की, पोलिस कारवाई केल्याशिवाय निजमाची सत्ता सुटणार संरक्षण मंत्री सरदार बलदेव सिंग यांच्या पाठीशी असलेले तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल यांना विलक्षण धैर्य दाखवले आणि १३ सप्टेंबर १९४८ रोजी मेजर जनरल जे. एन. यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्य हैदराबाद पाठवण्यात आले. हे काम जनरल चौधरींकडे सोपविले. या कारवाईला "ऑपरेशन पोलो" हे नाव दिले गेले. चोवीस तासात पोलिसांची कारवाई जवळपास यशस्वी झाली आणि सर्वत्र हसू उमटवले. निजामने शरणागती पत्करली. कासीम रिझवीला[३०] १९ सप्टेंबर १९४८ रोजी अटक करण्यात आली आणि त्याला सात वर्षाच्या सश्रम कारावास शिक्षा झाली आणि शेवटी तो पाकिस्तानात गेला. रझाकारांना[३१] संपवण्यात आले आणि त्यांच्यापैकी अनेकांना सार्वजनिक सुरक्षा नियमानुसार त्याब्यात घेण्यात आले. निजामने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास संमती दिली. १ नोव्हेंबर १९४८ रोजी भारतीय संघराज्यात सामील झाला.[३२] अशा प्रकारे, हैदराबाद (मराठवाडा) निजामाच्या मगारमिठीतून कायमचा मुक्त झाला.

**उपसंहार**

मुघलांच्या नंतर भारतात इंग्रजांची सत्ता निर्माण झाली. इ.स. १७५७ ते १९४७ पर्यंत भारत हा इंग्रजांच्या अधिसत्तेखाली होता. इ.स. १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. इंग्रज भारत सोडून गेले पण भारतावर एक घाव घातला तो फाळणीचा या फाळणीतून दोन सार्वभौम राज्ये निर्माण झाली, भारत (हिंदुस्थान) आणि पाकिस्तान. इंग्रजांनी भारतातील संस्थकांना तीन पर्याय सुचवले त्यामुळे भारताची अखंडता धोक्यात आली. भारतात ५६२ संस्थाने विलीन झाली मात्र जम्मू – काश्मीर, जुनागड आणि हैदराबाद ही तीन संस्थान विलीन होण्यास मान्य नव्हती. हैदराबाद संस्थानांत सुरू असलेल्या या चळवळीला हैदराबाद (मराठवाडा) मुक्ती संग्राम असे म्हणतात. भारताच्या आणि मराठवाड्याच्या इतिहासातील सर्वात महत्वपूर्ण संग्राम मानला जातो. ह्या मुक्तीसंग्रामाला राष्ट्रीय चळवळीतील नेत्यांनी ही पाठिंबा दिला. निजामाने सर्व बाजूंनी अत्याचाराचा उच्छाद मांडलेला. सर्वसामान्य जनता अत्याचाराखाली भरडली जात होती. याविरुद्ध सर्वांनी एकत्र येऊन एक दैदिप्यमान लढा दिला. या मुक्ती लढ्याला मराठवाड्यातील नेत्यांच्या, महिलांचा, विद्यार्थ्यांचा आणि जनतेचा सिंहाचा वाटा आहे. १७ सप्टेंबर हा हैदराबाद मुक्तीसंग्रामाचा दिवस मराठवाड्यात 'मराठवाडा मुक्तिदिन' म्हणून साजरा केला जातो.

**तळटिपा आणि संदर्भ साधने**


१. प्रा. जितेंद्र भामरे, समकालीन भारताचा इतिहास (१९४७ ते २०००), शेठ पब्लिशर्स, मुंबई, २०१८, पृष्ठ क्रमांक ५
२. लोकमत, १६/०८/२०२२
३. आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ – २०१५), स्पेट्रम, के' सागर पब्लिकेशन, पुणे, २०१९, पृष्ठ क्रमांक १९८
४. प्रा. जितेंद्र भामरे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८४८ – १९६०), शेठ पब्लिशर्स, मुंबई, २०१५, पृष्ठ क्रमांक १३०
५. लोकसत्ता, लोकरंग, १८/०९/२०२२
६. प्रा. जितेंद्र भामरे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, उपरोक्त, पृ. १३०
७. कित्ता, पृष्ठ क्रमांक १९८
८. केशवराव कोरटकर हे एक स्वातंत्र्यसैनिक, हैदराबाद संस्थानाचे मुख्य न्यायाधीश होते
९. वामनराव नाईक "हैदराबाद सामजिक सुधार संघ" याचे संस्थापक होते
१०. निजाम राज्यात "वैदिक संदेश" या वृत्तपत्राने महत्त्वपूर्ण भूमिका निभवली
११. प्रा. जितेंद्र भामरे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८४८ – १९६०), शेठ पब्लिशर्स, मुंबई, २०१५, पृष्ठ क्रं १३०
१२. https://latur.gov.in./मराठवाडामुक्तीसंग्रामदिन/लातूर/जिल्हा/India
१३. Prof. Shyam M. Sayanekar, History of Modern Maharashtra, Sheth Publishers, Mumbai, 2013, Page No. 116
१४. प्रा. जिंतेंद्र भामरे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, उपरोक्त, पृ १६१
१५. Prof. Shyam M. Sayanekar, उपरोक्त, पृष्ठ क्रमांक ११६
१६. अनंत लक्ष्मण कान्हेरे, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक सशस्त्र क्रांतिकारक होय
१७. Prof. Shyam M. Sayanekar, History of Modern Maharashtra (1848-1960), Sheth Publishers, Mumbai, Page No 117
१८. लोकसत्ता, लोकरंग, १८/०९/२०२२
१९. प्रा. जितेंद्र भामरे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८४८ – १९६०), शेठ पब्लिशर्स, मुंबई, २०१५, पृष्ठ क्रमांक १३३
२०. डॉ. गणेश राऊत, इतिहास, इयत्ता – बारावी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, २०२०, पृष्ठ क्रमांक ५३
२१. Prof. Sayanekar, उपरोक्त, पृष्ठ क्रमांक ११९
२२. https://latur.gov.in/मराठवाडामुक्तीसंग्रामदिन/लातूर/जिल्हा/India/
२३. https://www.esakal.com/amp/desh/the-vand-matram-student-played-a-major-role-in-the-sucess-of-the-marthwada-liberation-struggle-dds97. वंदे मातरम चळवळ, सकाळ वृत्तपत्र.
२४. लोकमत, ०९/०८/२०२३
२५. प्रा. जितेंद्र भामरे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८४८-१९६०), शेठ पब्लिशर्स, मुंबई, २०१५, पृष्ठ क्रमांक १३४, १३५
२६. https://vishwakosh.marathi.gov.in/in/मराठीविश्वकोश,हैदराबादमुक्तीसंग्राम

२७. नारायण पवार (१९२५ ते १२ डिसेंबर २०१०), भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते आणि आर्य समाजाचे सदस्य होते. ते हैदराबाद सशस्त्र संघर्षाचे नायक रवी नारायण रेड्डी यांचे अनुयायी होते

२८. प्रा.जिंतेंद्र भामरे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, उपरोक्त, पृष्ठ क्रमांक १३६

२९. स्वामी रामानंद तीर्थ, हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यातील एक थोर नेते, विद्वान व ऋषितुल्य, व्यक्तिमत्त्व

३०. कासीम रिझवी – हे मजलिस ए- इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाचे अध्यक्ष होते

३१. रझाकार - हा एक अरबी शब्द आहे. ज्याचा शाब्दिक अर्थ 'स्वयंसेवक' असा आहे

३२. Prof. Shyam M. Sayanekar, History of Modern Maharashtra (1848-1960), Sheth Publication, Mumbai, 2013, Page No 123